क्रमांक १०१९(२)/२०१७/१४-ब दिनांक ९ सप्टेंबर, २०१९

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१७ (जाहिरात क्रमांक ४८/२०१७)

## सुधारित अंतिम निकालाची घोषणा

समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्रमांक ४१५९/२०१८, रिट याचिका ६५७८/२०१८, रिट याचिका क्रमांक १०८३७/२०१८ व रिट याचिका क्रमांक १०५७८/२०१८ प्रकरणी एकत्रित अंतिम न्यायनिर्णय मा. उच्च न्यायालयाने दिनांक ८ ऑगस्ट, २०१९ रोजी दिला आहे. सदर न्यायनिर्णय व त्याअनुषंगाने शासनाने दिनांक ७ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेले अभिप्राय विचारात घेऊन शासनाच्या समांतर आरक्षणासंदर्भातील शासन परिपत्रक दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ व त्यासंदर्भात दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजीच्या शुध्दिपत्रकातील तरतूदीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ०६ ऑगस्ट, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षा -२०१७ च्या एकूण ८३२ पदांचा सुधारित अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मुळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधिन राहून दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. सदर परीक्षेमध्ये पुणे जिल्हयातील श्री. थोरात विशाल अशोक (बैठक क्रमांक PN008328) हे राज्यातून प्रथम आले आहेत व अहमदनगर जिल्हयातील श्री. हरडे प्रविण राजाराम (बैठक क्रमांक PN013016 ) हे मागास वर्गवारीतून राज्यातून प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून अहमदनगर जिल्हयातील श्रीमती वाळके स्नेहल सुदाम (बैठक क्रमांक PN005112) हया राज्यातून प्रथम आल्या आहेत.

३. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व किमान गुणाची सीमारेषा (cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

४. सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षा -२०१७ दिनांक ०६ ऑगस्ट, २०१७ रोजी मुंबईसह औरंगाबाद, नागपूर व पुणे या जिल्हाकेंद्रावर घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेच्या पूर्व परीक्षेकरिता ६९,८४८ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. सदर परीक्षेमधून सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षेकरिता ९,८७० उमेदवार अर्हताप्राप्त ठरले होते. प्रस्तुत लेखी परीक्षेच्या सुधारीत निकालाच्या आधारे ८३२ उमेदवारांची शिफारस करण्यात येत आहे.

५. प्रस्तुत परीक्षेचा सुधारीत निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहुन जाहिर करण्यात आला आहे. मूळ अर्ज क्रमाक ४३६/२०१७ मधील अंतिम आदेशाच्या अधीन राहुन अराखीव (महिला) वर्गवारीचे एक पद रिक्त ठेवण्यात आले आहे.

६. प्रस्तुत निकालाआधारे शिफारसपात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्य प्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरून प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-क पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा विहित दिनांकाचा किंवा तत्पूर्वीचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहिल.

७.माजी सैनिक प्रवर्गातील शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या दाव्यांची सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २ सप्टेंबर,१९८३ च्या व त्यासंदर्भातील अन्य शासन परिपत्रकांच्या अनुषंगाने सर्व बाबी शासन स्तरावर तपासण्याच्या अधीन राहून शिफारस करण्यात आली आहे.

दिनांक: ०९ सप्टेंबर, २०१९

ठिकाण : मुंबई

उपसचिव (परीक्षा-१)

महाराष्ट्र लोकसेवा आयोग